# महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्या वेळी उमेदवारांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना

## १. परीक्षा उपकेंद्रावरील उपस्थितीबाबत :-

**१.१** परीक्षा उपकेंद्रावरील उपस्थितीकरीता निर्धारित केलेल्या वेळेस उपस्थित राहून उपस्थिती नोंदविणे अनिवार्य आहे.

**१.२** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा परीक्षेस प्रवेश नाकारला जाईल.

**१.३** उमेदवारांची तपासणी/झडती (Frisking), ओळख पडताळणी करणे, हजेरी नोंदविणे, सूचना देणे इत्यादी स्वरुपाच्या कार्यवाहीसाठी परीक्षा उपकेंद्रावर **प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान दीड तास अगोदर उपस्थित राहणे** अनिवार्य आहे.

**१.४** परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उदभवू शकणाऱ्या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, विहित वेळेच्या पुरेसे अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**१.५** परीक्षा कक्षामध्ये शेवटच्या प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

**१.६** परीक्षा उपकेंद्राच्या आवारामध्ये मित्र, नातेवाईक, पालक अथवा अन्य अनधिकृत कोणत्याही परिस्थितीत प्रवेश अनुज्ञेय नाही.

**१.७** परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहण्याकरीता उमेदवारांनी शक्यतो सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. खाजगी वाहनांच्या पार्किंगकरीता उपकेंद्रावर कोणतीही व्यवस्था करण्यात येणार नाही.

**१.८** परीक्षेवेळी मद्य आणि/किंवा मादक अमली पदार्थांचे प्राशन केलेले आढळल्यास उमेदवारांवर उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, अशा उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा निवडीकरिता प्रतिरोधित करण्यात येईल.

**१.९** पडताळणी/तपासणी संदर्भातील कार्यवाही झाल्यानंतर स्वत:च्या बैठक क्रमांकावर जाऊन बसणे अनिवार्य आहे.

## २. ओळखीच्या पुराव्याबाबत:-

**२.१** परीक्षेच्या वेळी ओळखीच्या पुराव्यासाठी खालीलपैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे:-

(१) आधारकार्ड
(२) निवडणूक आयोगाचे ओळखपत्र
(३) पासपोर्ट
(४) पॅनकार्ड
(५) स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स

**२.२** परीक्षेच्या वेळी प्रवेश प्रमाणपत्र आणि वर नमूद पाच वैध (Valid) ओळखपत्रांपैकी **किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र** व त्याची सुस्पष्ट **छायांकित प्रत सादर न केल्यास** परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल.

**२.३** मूळ ओळखपत्राच्या पुराव्याऐवजी केवळ त्याच्या छायांकित प्रती अथवा कलर झेरॉक्स अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा ओळखीचा पुरावा सादर केल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व उमेदवारास परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल.

**२.४** उमेदवाराचे छायाचित्र व इतर मजकूर सुस्पष्टपणे दिसेल अशी मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत्येक पेपरच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

**२.५** भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह रंगीत प्रिंट मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**२.६** नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहीत स्त्रियांच्या बाबतीत), नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

## ३. सोबत आणण्यास/बाळगण्यास परवानगी असलेले साहित्य:-

**३.१** परीक्षा कक्षामध्ये फक्त खालील साहित्य घेऊन जाण्यास परवानगी राहील:-

(१) आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले सुस्पष्ट स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र
(२) काळ्या शाईचे बॉल पॉईंट पेन
(३) मूळ वैध ओळखपत्र
(४) मूळ वैध ओळखपत्राची सुस्पष्ट छायांकित प्रत
(५) पाण्याची (पारदर्शक) बॉटल

**३.२** लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची परवानगी देण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांना आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'दिव्यांग उमेदवारांना मार्गदर्शक सूचनां' मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे परीक्षा कक्षामध्ये नेण्यास परवानगी राहील. तथापि, आवश्यक कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे परीक्षा कक्षामध्ये घेऊन गेल्यास आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**३.३** परवानगी नसलेले अन्य कोणतेही साहित्य (पाऊच, पर्स, बॅग्ज, नोट्स, पुस्तक, लेखन पॅड इत्यादी) परीक्षा कक्षामध्ये नेण्यास सक्त मनाई आहे.

**३.४** स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल दूरध्वनी, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, परिगणक (Calculator) इत्यादी परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे.

**३.५** आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्या वेळी संबंधित परीक्षा उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा शाळा/ महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

## ४. कार्बनलेस उत्तरपत्रिकांच्या वापराबाबत उमेदवारांना विशेष सूचना :-

**४.१** उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळावी. ती हाताळताना वा उत्तरे लिहिताना चुरगळू नये, फाडू नये अथवा टाचणी किंवा टॅगने छिद्रे पाडू नयेत. तसेच, उत्तरपत्रिका पाण्याने, घामाने अथवा धुळीने खराब होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**४.२** उत्तरपत्रिकेवरील माहिती भरण्यासाठी व योग्य उत्तराचे वर्तुळ छायांकित करण्याकरिता फक्त काळया शाईचे बॉल पॉईंट पेन वापरावे. हे करतांना दुय्यम प्रतीवरही स्पष्ट खूण दिसण्यासाठी पुरेसा दाब द्यावा.

**४.३** उत्तरपत्रिकेवरील मजकुरामध्ये बदल करण्यासाठी White Fluid, Blade अथवा तत्सम साधनांचा कोणत्याही परिस्थितीत वापर करु नये.

**४.४** परीक्षा कालावधीतच उत्तरपत्रिकेवर परीक्षेचे नांव, बैठक क्रमांक (Roll Number), प्रश्नपत्रिका क्रमांक, संच क्रमांक, प्रवेश प्रमाणपत्रावर नमूद केलेला विषयाचा संकेतांक (Subject Code) योग्य ठिकाणी इंग्रजीमध्ये व अचूकपणे नमूद करुन विहित ठिकाणी स्वाक्षरी करावी.


**४.५** उत्तरपत्रिकेवर स्वत:चे नांव अथवा स्वत:ची ओळख पटेल असा कोणताही तपशील नमूद करु नये.

**४.६** प्रश्नपुस्तिकेत विहित केलेल्या जागीच कच्चे काम करावे. उत्तरपत्रिकेवर अथवा अन्य ठिकाणी कच्चे काम अथवा अन्य कोणताही तपशील नमूद करु नये.

**४.७** प्रश्नपुस्तिकेवरील इंग्रजी आद्याक्षरातील संच क्रमांक (उदा. A,B,C किंवा D) उत्तरपत्रिकेवर विहित ठिकाणी अचूकपणे नमूद करावा. तसेच, सदर संच क्रमांकाचे संबंधित वर्तुळ अचूकपणे छायांकित करावे.

**४.८** प्रश्नपुस्तिकेचा संच क्रमांक उत्तरपत्रिकेवर अचूकपणे न नोंदविल्यास शून्य गुण देण्यात येतात.

**४.९** प्रश्न क्रमांकासमोर दिलेल्या चार पर्यायांपैकी निवडलेल्या उत्तराचे वर्तुळच उत्तरपत्रिकेवर पुढील "योग्य" मध्ये दर्शविलेल्या पध्दतीप्रमाणे छायांकित करावे:-




**४.१०** उत्तरपत्रिकेवर प्रश्नांच्या उत्तराचे संबंधित वर्तुळ आवश्यक दाब देवून छायांकित करावे जेणेकरुन त्याचा छाप (Impression) उत्तरपत्रिकेच्या कार्बनलेस प्रतीवर (भाग-२) वर व्यवस्थित उमटेल याबाबत आत्यंतिक दक्षता घेण्यात यावी.

**४.११** प्रश्नाचे उत्तर नमूद करण्याकरीता प्रत्येक प्रश्नाकरीता प्रत्येकी एकच वर्तुळ छायांकित करावे. एकापेक्षा अधिक वर्तुळे छायांकित केल्यास अथवा तसा कोणत्याही प्रकारे प्रयत्न केल्यास अशा प्रश्नांच्या उत्तरास चुकीचे उत्तर समजण्यात येईल.

**४.१२** एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने नमूद केल्यास अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केल्यास, त्या प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येईल.

**४.१३** उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या बरोबर उत्तरांनाच गुण दिले जातात. उमेदवारांने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी २५% किंवा १/४ गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.

**४.१४** वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना, एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**४.१५** एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरित असेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दती लागू असणार नाही.

**४.१६** उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर नमूद केलेल्या प्रश्नपुस्तिकेच्या संच क्रमांकानुसारच उत्तरपत्रिकांचे संगणक संस्करण केले जाते. संच क्रमांक चुकीचा लिहिल्यास अथवा नमूद केलेल्या संच क्रमांकामध्ये तफावत आढळून आल्यास त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. परीक्षेनंतर यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

**४.१७** परीक्षेचा कालावधी संपेपर्यंत उत्तरपत्रिकेचा भाग-२ मूळ उत्तरपत्रिकेपासून कोणत्याही परिस्थितीत वेगळा करु नये, अथवा उघडण्याचा प्रयत्न करु नये.

**४.१८** परीक्षेनंतर मूळ उत्तरपत्रिका (भाग-१) समवेक्षकाकडे जमा करताना ती भाग-२ पासून विहित ठिकाणी (Perforation mark वर) व्यवस्थितरित्या फाडून, वेगळी करावी.

**४.१९** मूळ उत्तरपत्रिकेपासून भाग-२ वेगळा करताना मूळ उत्तरपत्रिका फाटणार नाही, अथवा चुरगळणार नाही, याची आत्यंतिक दक्षता घ्यावी.

**४.२०** परीक्षेनंतर उत्तरपत्रिकेचा भाग-१ समवेक्षकाकडे जमा करताना उमेदवारांकडील उत्तरपत्रिकेची प्रत (भाग-२) समवेक्षकाकडे जमा करु नये.

**४.२१** उमेदवारांकडील उत्तरपत्रिकेचा भाग-२ हा सुध्दा महत्वाचा दस्तऐवज असल्याने तो व्यवस्थित व सुरक्षितपणे निवडप्रक्रियेचा अंतीम निकाल लागेपर्यंत जतन करावा.

**४.२२** परीक्षेनंतर उमेदवारांकडील भाग-२ वर कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारचा बदल अथवा खाडाखोड करु नये.

**४.२३** निवड प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता तसेच अचूकता आणण्याचा आयोगाचा उद्देश असल्याने विविध प्रकारची तपासणी किंवा पडताळणी आयोगाकडून केली जाते. यामध्ये शासन सेवेत प्रविष्ट होवू इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये आवश्यक असणारा प्रामाणिकपणा व शिस्त याची पडताळणीही होवू शकते. त्याकरीता भविष्यात कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांकडील उत्तरपत्रिकेचा भाग-२ आयोगाकडून मागविला जावू शकतो. त्यावेळी उमेदवाराने मूळ स्वरुपातील उत्तरपत्रिकेचा भाग-२ सादर करणे अनिवार्य आहे.

**४.२४** सदर उत्तरपत्रिका ही आयोगाची मालमत्ता असून ती, कोणत्याही प्रकारे अनधिकृतपणे हाताळण्याची अथवा जवळ बाळगण्याची कोणत्याही व्यक्तीला परवानगी नाही. अशी कृती अनधिकृत व बेकायदेशीर समजण्यात येते.

## ५. पारंपरिक स्वरुपाच्या पेपरसाठी विशेष सूचना :-

**५.१** आयोगाकडून परीक्षेच्यावेळी पुरविण्यात येणाऱ्या उत्तरपुस्तिकेमध्ये दिलेल्या पृष्ठांवरच उत्तरे नमूद करणे आवश्यक आहे. मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त कोणत्याही परिस्थितीत पुरवणी म्हणून अतिरिक्त उत्तरपुस्तिकेचा पुरवठा करण्यात येणार नाही.

**५.२** उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठांची मागील बाजू वगळून इतर पृष्ठांच्या दोन्ही बाजूस उत्तरे लिहावीत. प्रत्येक प्रश्न नवीन पृष्ठावर सोडवावा. परंतु उपप्रश्न त्याच पृष्ठावर सोडवावा.

**५.५** उत्तरे लिहिण्यासाठी स्वत:चे फक्त निळ्या किंवा काळ्या शाईपैकी कोणत्याही एकाच रंगाच्या शाईच्या पेनचा वापर करणे आवश्यक राहील. शाई अथवा पेन बदलावे लागल्यास पर्यवेक्षक / समवेक्षक यांची बदलाच्या ठिकाणी स्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही.

**५.६** प्रश्नपत्रिकेत सूचना केल्याप्रमाणेच प्रश्न सोडवावेत. प्रश्नांचा व उपप्रश्नांचा क्रमांक सुवाच्य अक्षरात काटेकोरपणे लिहावा.

**५.७** प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नाची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा उपप्रश्न दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडविल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

**५.८** पत्र लिखाण अथवा अर्जदाराचे स्वत:चे नाव लिहावयाचे असते अशा प्रकरणी उदा. पत्रलेखनात पत्रलेखक म्हणून स्वत:चे अथवा इतर कोणतेही काल्पनिक नाव न लिहिता त्याऐवजी इंग्रजी माध्यम असल्यास "XYZ" लिहावे व मराठी माध्यम असल्यास "अबक" लिहावे. याऐवजी अन्य अक्षरे लिहिली गेल्यास अथवा इतर कोणतेही काल्पनिक नाव लिहिल्यास गैरप्रकार करण्याच्या उद्देशाने केले, असे समजण्यात येईल.

**५.९** उत्तरपुस्तिकेवर स्वाक्षरी अथवा बैठक क्रमांक विहित ठिकाणाव्यतिरिक्त इतरत्र नमूद केला असेल, तसेच स्वत:चे नांव, सांकेतिक खुणा वा चित्र काढले असेल, अप्रस्तुत शब्द लिहिले असतील तर ते आक्षेपार्ह लिखाण समजण्यात येईल व अशा उमेदवारांच्या बाबतीत आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार उचित कारवाई करण्यात येईल.

**५.१०** उत्तरामध्ये मुद्दे प्रकर्षाने (highlight) दर्शविण्यासाठी मुद्यांपूर्वी खुणा करणे, मुद्दा अधोरेखित करणे, अथवा अन्य कारणांसाठी इतर कोणत्याही प्रकारचे पेन, शाई अथवा तत्सम माध्यम वापरणे, याकरिता मनाई आहे.

**५.११** उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्नाचे किंवा उपप्रश्नाचे "पूर्ण" उत्तर खोडले असेल, रद्द केले असेल, रेघ मारलेली असेल अशा ठिकाणी कोणतीही सही न करता स्वत: फुली मारुन "रद्द केले" असे ठळक अक्षरात लिहावे. तथापि उत्तरामधील एखादा शब्द किंवा उत्तराचा भाग रद्द केला असल्यास त्या ठिकाणी "रद्द केले" असे लिहिण्याची आवश्यकता नाही. तसेच अशा ठिकाणी समवेक्षक/पर्यवेक्षक यांची स्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही.

## ६. परीक्षा कालावधी संपल्यानंतर करावयाची कार्यवाही:-

**६.१** परीक्षा कालावधी संपल्यानंतर मूळ उत्तरपत्रिका/उत्तरपुस्तिका लगेचच समवेक्षकांच्या ताब्यात द्याव्यात. तसेच सर्व उमेदवारांच्या मूळ उत्तरपत्रिका/उत्तरपुस्तिका समवेक्षकाकडे जमा होवून त्याचा हिशोब लागेपर्यंत कोणत्याही उमेदवारास परीक्षा कक्षाबाहेर जाण्याची परवानगी नाही.

**६.२** समवेक्षकाच्या परवानगीशिवाय उमेदवाराला स्वत:चे आसन सोडता येणार नाही.

**६.३** परीक्षेनंतर मूळ उत्तरपत्रिका/उत्तरपुस्तिका समवेक्षकाकडे जमा करणे अनिवार्य असून परीक्षा कक्षाबाहेर उत्तरपत्रिका/उत्तरपुस्तिका घेऊन जाणे अनुज्ञेय नाही.

## ७. सर्वसाधारण सूचना:-

**७.१** प्रस्तुत प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या प्रवेशासाठी निर्गमित करण्यात आले असून परीक्षेस प्रवेश दिला, म्हणून आयोगाने उमेदवारी स्वीकारली, असा अर्थ होत नाही. उमेदवार कोणत्याही टप्प्यावर अपात्र असल्याचे आढळून आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**७.२** प्रवेश प्रमाणपत्राच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवारावरच राहील. अन्य व्यक्तीकडून कोणत्याही कारणाकरीता सदर प्रवेश प्रमाणपत्राचा दुरुपयोग केला गेला, तर त्या व्यक्तीकडून मदत घेतली नसल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी उमेदवारावर राहील.

**७.३** आयोगाच्या संकेतस्थळावरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" या विभागामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सर्व तरतुदी काळजीपूर्वक वाचून त्यांचे कटाक्षाने अनुपालन करावे.

**७.४** प्रवेश प्रमाणपत्रावर तसेच परीक्षेच्यावेळी पुरविण्यात येणाऱ्या उत्तरपत्रिकेवर व प्रश्नपुस्तिकेवर दिलेल्या सूचना अत्यंत काळजीपूर्वक वाचून त्यांचे अनुपालन करावे.

**७.५** आयोगाच्या परवानगीशिवाय कोणत्याही परिस्थितीत लेखनिकाची मदत व/किंवा भरपाई वेळ घेता येणार नाही.

**७.६** परीक्षा उपकेंद्रप्रमुख, पर्यवेक्षक, समवेक्षक आदींकडून तसेच आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

**७.७** परीक्षेसंदर्भात आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांबाबत आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करणे, उमेदवाराच्या हिताचे राहील.

## ८. वैधानिक इशारा:-

वरील सूचनांचे तसेच परीक्षेच्या वेळी देण्यात येणा-या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता कायमस्वरुपी अथवा ठराविक कालावधीसाठी प्रतिरोधित (Debar) करण्यासह कायदेशीर कारवाई करण्यात येईल.